January-February-March-2022 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol. 9, Issue-1

## Multidisciplinary Issue




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

ERROR: undefined
OFFENDING COMMAND: s*t
STACK: --dict-- , --savelevel-- ,


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | The Struggle for Power in Pinter's 'The Caretaker' | **Dr A. K. Singh** | 05 |
| 2 | The Study of Identity Crisis in 'The God of Small Things' | **Smt. Sarala Sanap** | 09 |
| 3 | Ecological Awareness in Select Poems of A. K. Ramanujan: an Ecocritical Reading | **Dr. Anil Aher** | 14 |
| 4 | A Critical Study of Cyberspace and Cybernetics in William Gibson's Novel 'Monalisa Over Drive' | **Dr. Umaji Patil** | 18 |
| 5 | A Postmodernist Reading of the 'Inheritance of Loss' by Kiran Desai | **Dr. Sandeep Sanap** | 22 |
| 6 | A Novel Study on the Evaluation Mechanism in Current Educational System of India | **Dr. Nagin Patel** | 26 |
| 7 | A Study of Change Proneness and Stress of Organic and Conventional Farmers of Pune District( N/ 300) | **Deepa D. Naik** | 32 |
| 8 | 'Matsyagandha' to the Development of the Lives of Marine Fishermen in the Coastal Areas of Maharashtra | **Mr. Valmik Wagh, Dr. Abhay Shende** | 38 |
| 9 | Socio-Economic Status of Kaikadi Community in Maharashtra | **Shubhangi Sutar** | 43 |
| 10 | Dr. Babasaheb Ambedkar : Pioneer of Social Welfare in India | **Dr. Manish Sonawane** | 53 |
| 11 | Is Mobile Based Applications A Possible Soulution to Tackle the Mental Health Challenges Among Uniformed Forces: A Scoping Review | **Dr. Vinod Gajghate** | 60 |
| 12 | Achievement Through ERAC Technique: A Pilot Study | **Jayashri Patil, Dr. Santosh Khirade** | 66 |
| 13 | A Study of the Disaster Management in Ratnagiri District College Libraries | **Dr. Rajesh Rajam** | 71 |
| 14 | Future of Academic Libraries' Sustainability in Changing Information World | **Dr. Neha M. Joshi** | 78 |
| 15 | Library and Information Science Education in Maharashtra Universities | **Prof. Shubham Patil, Dr. Manisha Dhangal** | 84 |
| 16 | A Correlational Study of Suicidal Thoughts Among Undergraduate Students of Arts and Science Field | **Ashwini Jadhav** | 90 |
| 17 | A Study of Attitude Towards Research Among the Teachers at Secondary Level | **Jayashri Patil, Dr. Santosh Khirade** | 95 |
| 18 | Poverty In India | **Dr. Mahendra Agale** | 102 |
| 19 | A Study of Psychological Well-Being and Environmental Attitude Between Organic and Conventional Farmers of Pune District (N/300) | **Deepa Naik** | 107 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 20 | फोर्ट विलियम कॉलेज की भाषा नीति | **प्रो.मोहन** | 113 |
| 21 | हिंदी कहानी साहित्य में चित्रित धार्मिक एकता | **डॉ. शकिला जब्बार मुल्ला** | 118 |
| 22 | मुशर्रफ आलम जौकी के उपन्यासों में राजनैतिक परिवेश | **प्रा. सुनिल कांबळे, डॉ.बी.डी.वाघमारे, डॉ. शंकर पजई** | 121 |
| 23 | 'पोस्ट वॉक्स नं. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | शशिप्रभा शास्त्री के उपन्यासों में नारीविमर्श | डॉ. महेंद्र रघुवंशी | 141 |
| 28 | मैत्रेयी पुष्पा की आत्मकथा में स्त्री विमर्श | प्रा. मीना ठाकूर | 145 |
| 29 | मानवता के लिए संघर्षरत नारी : 'राजो' | प्रा. हसीना मालदार | 148 |
| 30 | 'पलकें सुलग रही है' कविता संग्रह में सामाजिक चेतना | श्री. सचिन कांबळे | 151 |
| 31 | अनुवाद : एक अनमोल देन | डॉ. वासुदेव शेट्टी | 154 |
| 32 | महिला सशक्तिकरण - आभास और वास्तव | श्री. संजय जाधव | 158 |
| 33 | जल, कृषी, स्वास्थ, सामाजिक जीवन, औद्योगिक क्षेत्र के विकास में पर्यावरण का प्रभाव | डॉ. मीना ठाकूर | 162 |
| | **मराठी विभाग** | | |
| 34 | आदिवासींचा होळी उत्सव | डॉ. अंजली मस्करेन्हस | 165 |
| 35 | 'जत्रा' या कथासंग्रहातून येणारे तडवी बोली व समाज जीवन | डॉ. धनराज धनगर | 170 |
| 36 | नंदुरबार जिल्ह्यातील महार समाजाचे लोकजीवन आणि लोकसंस्कृती | प्रा. कल्पना साळवे | 175 |
| 37 | कोकणा बोली आणि मराठी भाषा | श्री. लक्ष्मण टोपले | 178 |
| 38 | गडकऱ्यांची नाट्यसृष्टी व स्त्री प्रतिमा | प्रा. यादवराव गहाणे | 185 |
| 39 | विविध प्रश्न, उपरोधिक शैलीत मांडणारा प्रयोगशील नाटककार : शफाअत खान | डॉ. रवींद्र कांबळे | 189 |
| 40 | वेदनांची अनुभूती देणारा काव्य संग्रह - 'विस्तवाचे ओझे' | प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे | 194 |
| 41 | 'मी मेलो त्याची गोष्ट' - एक वास्तवाभिमुख कादंबरी | डॉ. संगीता शेळके | 200 |
| 42 | 'काळी गंगा' कादंबरेंल्या वातावरण निर्मितीचो चिकित्सक अभ्यास | दीपराज सातर्डेकर | 203 |
| 43 | आंबेडकरवादी काव्यप्रकार | डॉ. गोविंद रावळेकर | 212 |
| 44 | डॉ. आंबेडकर यांचा शेती विषयक दृष्टिकोन | राहुल गोंगे | 217 |
| 45 | आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना | प्रा. कृष्णा पाडवी | 221 |
| 46 | रशिया-युक्रेन युद्धाचा भारतावर झालेल्या व होणाऱ्या परिणामांचा अभ्यास | डॉ.एन.एन.गाढे | 229 |
| 47 | भारतातील लघुउद्योगांच्या समस्यांचा अभ्यास | प्रा. युवराज जाधव | 234 |
| 48 | लाखनी तालूक्यातील भात गिरणी कामगारांचा अभ्यास | डॉ. सुरेश बन्सपाल | 241 |
| 49 | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना | प्रा. कृष्णा पाडवी | 245 |
| 50 | समाजकार्य शिक्षणाचे भारतीयकरण | डॉ. अनंत देशमुख | 250 |
| 51 | भारतातील संसदेचा उगम आणि विकास | डॉ. देविदास नरवाडे | 255 |
| 52 | महिलांचे आर्थिक सक्षमीकरण : स्वरूप व महत्त्व | डॉ. विवेक चौधरी | 260 |
| 53 | माहिती अधिकार कायदा २००५- एक कायदेशीर अधिकार | डॉ. पद्माकर दारोंडे | 264 |
| 54 | पुणे शहरातील निवडक ऐतिहासिक स्थळे : एक अभ्यास | डॉ. राजेंद्र रासकर | 269 |
| 55 | वागलाण मधील राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास | रत्नाकर सुभाष वाघ | 274 |
| 56 | सिट अप्सचा कुमार गटातील विद्यार्थ्यांच्या स्नायुंची ताकद व दमदारपणावर होणारा परिणाम | डॉ. विशाल गायकवाड | 278 |
| 57 | सूर्यनमस्कार - एक सर्वांग परिपूर्ण व्यायाम | प्रा. भाऊसाहेब थोरात | 281 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 9, Issue 1 | Multidisciplinary Issue | Peer Reviewed Journal | E-ISSN : 2348-7143 | Jan – Mar 2022

# केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना

**प्रा. कृष्णा रावा पाडवी**
अर्थशास्त्र विभाग,
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा
ता.बागलाण जि.नाशिक.
मो.न.09922999255
Email- krishnarawapadvi5555@gmail.com
संशोधन केद्रांचे नावःके.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

**प्रस्तावना :**

केंद्रवर्ती अर्थसंकल्पयोजनेचे उदेश व स्वरुप अत्यंत महत्वपूर्ण आहे.
आदिवासींच्या विकासाकरिता शासनादृारे अनेक योजना राबविण्यात येत असल्या तरी स्थानिक गरजा लक्षात घेऊन लहान नियमित योजनाद्वारे जो लाभ आवश्यक असूनही आदिवासींना देता येत नाही. अशा प्रकारचा लाभ देण्याकरिता लहान लहान नाविन्यपूर्ण संकल्पना/योजना तयार करुन, शासनाची मंजूरी घेण्याच्या नियमित प्रक्रियेस लागणारा विलंब टाळून, त्वरित मंजूर करुन, आदिवासींना लाभ मिळवून देण्याच्या उदेशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत न्युक्लिअस बजेट तरतूर सर्व प्रकल्पांना उपलब्ध करुन देण्यात येते. विभागीय पातळीवर नेमण्यात आलेल्या निर्देश समितीद्वारे या योजनांना मंजूरी देण्यात येते.

स्थानिक गरजेवर आधारीत नियमित योजनांतर्गत देण्यात येणाऱ्या लाभापेक्षा वेगळया संकल्पनेवर आधारीत आर्थिक उत्पन्नवाढ,प्रशिक्षण, मानव साधन संपत्ती विकास व कल्याणात्मक योजनांकरिता एका कुटुंबाकरिता जास्तीत जास्त रुपये 10,000 पर्यंत शासनाने ठरवून दिलेल्या वर्गवारीनुसार 50 ते 100 टक्के पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते.

सर्वसाधारणपणे पात्रतेच्या अटीः उदा 1.प्रत्येक प्रकल्पातील परिस्थितीनुसार राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अटी अर्थसहाय्ययाचे स्वरुप इ. निर्देश समितीद्वारा निश्चित करण्यात येते. प्रामख्याने संपर्कः उदा प्रकल्पात राबविण्यात येणाऱ्या योजना,त्यांच्या अटी, आर्थिक सहाय्ययाचे स्वरुप इ. बाबत संबधित प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात संपर्क करावा लागतो.

**शोधनिबंधाची उद्धिष्टये :**

1. केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनांचा अभ्यास करणे.
2- केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनांचे योगदान अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

1. केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना आदिवासी विकास विभागामार्फत कार्यरत आहे.
2. केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना स्थलकालानुसार आणि परिस्थतीनुसार राबविणे आवश्यक आहेत.

**संशोधन पध्दतीः**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. उदा. त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, महाराष्ट्र शासनाचे विविध परिपत्रके, विविध वार्षिक अहवाले, नियतकालिके, मासिके साप्ताहिके, दैनिक वर्तमानपत्रे, विविधलेख, विविध संकेतस्थळे, आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका इ.चा संशोधनासाठी आधार घेण्यात आलेला आहेत्र.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्य (न्युक्लिअस बजेट) योजनांची माहिती.**

महाराष्ट्र राज्यात निरनिराळया क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी जमातींच्या विकासाच्या प्रगतीमध्ये ठिकठिकाणी तफावत आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकास कार्यक्रमाच्या गरजाही भिन्न आहेत. प्रत्येक प्रकल्प क्षेत्रातील

भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधनसंपत्ती मधील विपूलता त्रुटी, योजना यामध्ये भिन्नता व तफावत असल्यामुळे समान विकासाच्या दुष्टीने एकाच प्रकारचे कार्यक्रम उपयुक्त ठरणार नाहीत आदिवासी विकास कार्यालय कर्जाच्या योजनांमध्ये स्थल, कालानुरुप लवचिकता व अभिनवता आणणे आवश्यक असल्यास त्याच्यासाठी सुयोग्य असे विविध कार्यक्रम. स्थानिक पातळीवरच मंजूर करुन तातडीने कार्यान्वित व्हावेत या उदेशाने शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक टीएसपी 1080/385/डी–4 (1) दिनांक 11 मे 1981 अन्वये सन 1981–82 पासून केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत " न्युक्लिअस बजेट" या नावाने एक स्वतंत्र निधी स्थानिक गरजेनुरुप वैयक्तिक विकासाची कामे/उपक्रम घेण्याकरीता उपलब्ध करुन देण्यास सुरुवात करण्यात आली.

1. **योजनेचा गाभा :**

अर्थसंकल्पांत अंतर्भूत नाहीत अशा आदिवासी विकासाच्या दृष्टीने अभिनव स्वरुपाच्या व स्थानिक महत्वाच्या योजना, तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घकाळ मंजूरीस्तव अडकून पडू नयेत या उदेशाने स्थानिक पातळीवरच मंजूर करुन तातडीने व प्रभावीवणे कार्यान्वित करुन त्याचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्षात त्वरीत मिळवून देणे हा या योजनेचा गाभा आहे. हया निधीतून घेण्यात येणाऱ्या उपक्रमात नविन पदे निर्माण करता येणार नाहीत तसेच कर्जपुरवठा हाही योजनेचा उदेश नाही. शिवाय मूलभूत सोयींवर अत्यंत निकडीच्या प्रसंगी एकूण खचाच्या 10: खर्चाया योजनेतून भागविता येवू शकतो.

2. **विभाजन :**

या योजनेतून राबविता येणाऱ्या वैयक्तिक व सामुहिक लाभांच्या कार्यक्रमांचे चार गटात विभाजन करण्यात आले आहे. उदा. अ) उत्पन्न निर्मितीकिंवा वाढीच्याा योजना ब) प्रशिक्षण योजना क) मानव साधन सपत्तींच्या विकासाच्या योजना ड) आदिवासी कल्याणाच्या योजना.

**अ)** अ गटात मोडणाऱ्या योजनांच्या आर्थिक अनुदानाची मर्यादा

1) सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी 50:
2) आदिम जमातीचे लाभार्थी 80:
3) जेथे लाभ रु.2000 पेक्षा कमी व लाभधारक हा दारिद्रय रेषेच्या खालील असल्यास 100:

**ब)** 'ब' गटातील प्रशिक्षण योजनेमध्ये हलके व जड वाहन चालक प्रशिक्षण वाहक (कंडक्टर) प्रशिक्षण, नोकरीपूर्व अनुभव प्रशिक्षण, टायपिंग प्रशिक्षण, इ. अनेक विविध प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक गरजेनुसार घेण्यात येतात.

**क)** 'क' गटात मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजनामध्ये क्रिडा, कला साहित्य व संस्कृती जोपासना व संवर्धन, व्यक्ती विकास शिबींर मेळावे, युवा व महिला मंडळांचे उपक्रम इ. विषयांच्या योजनांच्या समावेश होतो.

ड) 'ड' गटातील आदिवासी कल्याणात्मक योजनामध्ये आदिवासींच्या घराचे विद्युतीकरण अत्याचार व आपातकालीन विशेष सहाय्य व विशेषतःसामुहिक व वैयक्तिक कल्याणाच्या दुष्टीने आवश्यक उपक्रमांचा समावेश होतो.

**3) मंजूरीचे अधिकार :**

या योजनेअंतर्गत योजना घेतांना शासनाच्या मंजुरीकरीता न पाठविता या योजना स्थानिक पातळीवर निर्देश समितीद्वारा मंजूर करुन घेतल्या जातत. निर्देश समितीत अपर आयुक्त हे अध्यक्ष तर शासनाने नियुक्त केलेले नामनिर्देशित लोकप्रतिनिधी, योजना प्रस्तावित करणारे अधिकारी सदस्य तसेच संबंधित प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी सदस्य सचिव असतात. समितीने मंजूर केलेल्या योजनांना वित्तीय मंजूरी देण्याचे अधिकार रु.5 लाखापर्यत संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास रु.5 लाख ते 20 लाखा पर्यत आयुक्त. आदिवासी विकास तर त्यावरील रकमेच्या योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार सचिव, आदिवासी विकास विभाग यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या योजनांवर पुरक खर्चास अपवादात्मक परिस्थितीत मंजूरी देण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी विकास यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध योजनाः**

आदिवासी भागात कृषी व्यतिरिक्त स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता असल्याने स्वयरोजगाराचे प्रशिक्षण देऊन स्वतःचा व्यवसाय अथवा उघोगधंदा चालवून किंवा खाजगी, सार्वजनिक क्षेत्रात

असलेल्या उदयोगधंदामध्ये रोजगार प्राप्त करण्याच्या दृष्टीने युवकांना तयार करण्याच्या हेतूने आदिवासी विकास विभागाने काही महत्वाची प्रशिक्षणे सुरु केलेली आहेत. जसे पोलीस व लष्करामध्ये भरती होण्यासाठी भरतीपूर्व प्रशिक्षण देणे यासाठी नाशिक,जव्हार,ठाणे, नंदूरबार (धुळे) घोडेगांव (पुण), किनवट (नांदेड) धारणी (अमरावती) राजूरा चंद्रपुर देसाई गंज कडसा (गडचिरोली) व अकोला (अहमदनगर) या ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे चालविण्यात येतात. त्याचप्रमाणे पांढरकवडा ता.केळपूर जि.येवतमाळ येथे वाहनचालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी या विभागामार्फत प्रशिक्षण केंद्र चालविण्यात येते.

याशिवाय केंद्रचती अर्थसंकल्पना योजना (न्युक्लिअस बजेट) मधून आदिवासींसाठी घेण्यात आलेल्या विविध योजना खालीलप्रमाणे आहेत.

**केंद्रचती अर्थसंकल्पना योजना**

**अ) उत्पन्न निर्मीतीच्या किंवा वाढीच्या योजना :**

1. आदिवासी शेतकऱ्यांना फळझाडे व वनझाडे लगवडीसाठी अर्थसहाय्य
2. विटभट्टी व्यवसाया करिता अर्थसहाय्य.
3. तरुणांना बॅंड संच घेण्यासाठी अर्थसहाय्य.
4. तरुणांना स्वस्त धान्य दुकान चालविण्यासाठी अर्थसहाय्य.
5. महिलांना कुंकुटपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य.
6. किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य.
7. भाजीपाला व्यवसायासाठी अर्थसहाय्य.
8. पी.व्ही.सी.पाईप खरेदीसाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य.
9. सुतार व्यसायासाठी हत्यारे खरेदीसाठी अर्थसहाय्य
10. मधुमक्षिका पालनासाठी अर्थसहाय्य

**ब)प्रशिक्षण योजना**

1. बेकरीचे प्रशिक्षण
2. आदिवासी उमेदवारांना मराठी/इंग्रजी लघुलेखन प्रशिक्षण
3. संगणक (कॉम्प्युटरचे) प्रशिक्षण
4. टंकलेखनाचे प्रशिक्षण
5. आदिवासी तरुणांना बस वाहकाचा बिल्ला काढून देण्याचे प्रशिक्षण
6. आदिवासी तरुणांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण
7. अंगणवाडी कर्मचारी प्रशिक्षण
8. पशुसंवर्धनाचे प्रशिक्षण
9. टी.व्ही.दुरुस्तीचे प्रशिक्षण
10. चालक पदासाठी निवड झालेल्या उमेद्वारांना प्रशिक्षण
11. शिवणयंत्र पुरवठा व प्रशिक्षण
12. कार्यालयीन कामकाजाचे प्रशिक्षण
13. जडवाहन चालक प्रशिक्षण
14. हलके वाहन चालक प्रशिक्षण
15. बहुउद्देशिय आरोग्यसेवा प्रशिक्षण
16. 18 महिने आरोग्य सेवा प्रशिक्षण (नवीन विद्यार्थिनींना)
17. 18 महिने आरोग्य संवा प्रशिक्षण (जुन्या विद्यार्थिनींना)
18. 3 वर्षे जनरल नर्सिंग प्रशिक्षण
19. आदिवासी शेतकऱ्यांना आंवा,काजू लागवड प्रशिक्षण
20. आदिवासी शेतकऱ्यांना डाळींब लागवड प्रशिक्षण
21. दुग्ध व्यवसाय व पशुसंबर्धन प्रशिक्षण
22. मधमाशी पालन प्रशिक्षण

23. कृषी प्रशिक्षण
24. स्वयंरोजगार प्रशिक्षण
25. सेवापूर्व प्रशिक्षण शिबिर
26. सुतारकाम,गवंडीकाम प्रशिक्षण
27. गालीचा विणकाम प्रशिक्षण
28. आदिवासी तरुणांना रेशीम उद्योग प्रशिक्षण
29. आदिवासी तरुणांना बांबूपासून वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण
30. आदिवासी उमेदवारांना स्पर्धा परीक्षांकरिता प्रशिक्षण
31. आदिवासी तरुणांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण
32. पाढरकवडा येथील वाहनचालक प्रशिक्षण

**क) मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना :**

1. नृत्य स्पर्धेसाठी अर्थसहाय्य
2. शिक्षकांना अध्यापनास आधुनिक साधनांचा उपयोग करण्यासाठी मार्गदर्शनास आर्थिक सहाय्य.
3. 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजनास अर्थसहाय्य.
4. निसर्गोपाचार प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य.
5. शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी संभाव्य प्रश्नोत्तराचे संच पुरविणे
6. आदिवासी खेळाडूंच्या राज्यस्तरीय अर्थसहाय्य.
7. आदिवासी महिलांच्या जागृती मेळाव्यास अर्थसहाय्य.
8. ग्रामीण भागातील कलापथकांना अर्थसहाय्य.

**ड) आदिवासी कल्याणात्मक योजना :**

1. जळीतग्रस्त आदिवासी कुटुंबाना आर्थिक मदत देणे.
2. आदिवासी लोकांना आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संरक्षण, व्यसनमुक्ती व कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा चित्रपटांच्या माध्यमातून प्रसार करणे.
3. मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे.
4. आदिवासींच्या घरांना विद्युत फिटींग करण्यास अर्थसहाय्य.
5. मिनी अंगणवाडी सेविकांना अतिरिक्त मानधन देणे.
6. उपचार केंद्र उघडण्यास अर्थसहय्य.
7. धान्य कोष योजना राबविणाऱ्या संस्थांना खरेदीस अर्थसहाय्य.

या तरतूदीतून अधिकारी व लोक प्रतिनिधींना त्यांच्या नवनवीन कल्पना प्रत्यक्षात साकार करुन आदिवासींच्या विशेषतः आर्थिक उन्नतीचा पुरेपूर प्रयत्न करता येऊ शकतो. वर दिलेली यादी परिपूर्ण नसून स्थानिक गरजूरुप कोणतेही कार्यक्रम यात समाविष्ट करण्याची भूमा आहे. शासनाच्या योजना मंजूरीच्या नियमित प्रक्रियेस अपवार करुन ही संकल्पना अस्तित्वात आणण्यात आली आहे. हा एक प्रकारे स्थानिक अधिकारी व लोकप्रतिनिधींना आदिवासीच्या आर्थिक विकासास चालना देण्याकरीता दिलेला स्वेच्छानिधीच आहे. इतरच कोठेही ही संकल्पना आढळून येत नाही.

निष्कर्ष :

केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना अर्थसंकल्पात अंतर्भूत नाहीत अशी विकासाच्या दृष्टीने अभिनव स्वरुपाच्या व स्थानिक महत्वाच्या योजना, तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घकाळमंजुरीस्तव, अडकून पडू नयेत या उदेशाने स्थानिक पातळीवर योजना मंजूर करुन तातडीने त्यांचा लाभ गरजू आदिवासींना मिळवून देणे, ज्या योजना आदिवासींच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने स्थलकालानुसार राबविणे आवश्यक आहेत अशा स्वरुपाच्या योजनांची स्थानिक गरजांचे महत्व लक्षात घेऊन त्या प्रभावीपणे कार्यान्वित करणे व त्यांचा लाभ गरजू आदिवासीना देणे हा केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनेचा उदेश आहे. आदिवासी व्यक्ती कुटुंब

केंद्रबिंद्र मानून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करुन घेणे या दृष्टिकोनातून ही योजना परिणामकारक ठरली आहे.

संदर्भ


1. 'आदिवासी विकास विभाग नागरिकांची संनद', महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई 400032, पृष्ठ क्र 11
2. जे.जी.वळवी सहआयुक्त, आदिवासी विकास मंडळ, 'वचन वसुंधरा' बंगला शिवाजीनगर नाशिक पुणे रोड नाशिक 422006 , पृष्ठ क्र 43,44,45,46
3. गोंविद गारे, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टिमेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे.30 , पृष्ठ क्र 36